तरुण भारत

# भोगावती महाविद्यालयाचा शिवाजी विद्यापीठात गौरव



**कोल्हापूर : भोगावती महाविद्यालयाला सन्मानपत्र प्रदान करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत जयसिंगराव हुजरे, सर्जेराव पाटील, डॉ. दिनकर पाटील, आर. ए. सरनोबत आदी.**

प्रतिनिधी
भोगावती

कुरुकली (ता. करवीर) येथील भोगावती महाविद्यालयाला नॅकची 'ए" ग्रेड मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिन समारंभात महाविद्यालयाचा विशेष गौरव करण्यात आला. यावेळी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या पदाधिकाऱ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

भोगावती महाविद्यालयाने सर्वच क्षेत्रात केलेल्या चौफेर कार्याचा यावेळी कुलगुरु शिर्के यांनी गौरव केला. तसेच या महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी भोगावती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयसिंगराव हुजरे, उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, सर्व संचालक मंडळ, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. दिनकर पाटील, प्राचार्य आर. ए. सरनोबत, नॅकचे समन्वयक डॉ. टी. एम. चौगले, उपप्राचार्य डॉ. पाटील, आर. बी. हंकारे, अधिक्षक पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.